ePaper
ठाकरे गटाने निष्ठावंत गमावला, मा. आ. ज्ञानेश्वर पाटील यांचे निधन




| वर्ष - 8 | अंक -86 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**
- लाडक्या बहिणींसाठी खुशखबर!
- छोट्या निविदांची प्रक्रिया सुरू ठेवावी!
- पवारांची सर्वोच्च न्यायालयात धाव!
- झाकीरसाठी पाकिस्तानच्या पायघड्या!


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 03 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आचारसंहितेपूर्वी या रस्त्याच्या भूमिपूजनाचा मार्गही मोकळा होणार

# 'रिंग रोड'च्या खर्चात वाढ!

### नऊ वर्षांत खर्च 42 हजार कोटींवर, मंत्रिमंडळ लवकरच देणार मंजुरी

**। पुणे । महाईन्यूज**

**पुणे आणि पिंपरी चिंचवडसाठी 'ग्रोथ इंजिन' ठरू पाहणाऱ्या वर्तुळाकार (रिंग रोड) रस्त्याच्या कामास झालेला विलंबामुळे २५ हजार कोटी रुपयांचा भुर्दंड बसला आहे. या रस्त्याचा खर्च दौड पटीने वाढला असून, २०१६-१७ मध्ये हा खर्च केवळ १७ हजार कोटी होता. आता तो ४२ हजार कोटीपर्यंत पोहोचला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या आठवड्यात या खर्चाला मान्यता मिळाल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आचारसंहितेपूर्वी या रस्त्याच्या भूमिपूजनाचा मार्गही मोकळा होणार आहे.**



पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून रिंगरोड जाणार असल्याने या रस्त्याची आखणी झालेल्या भागातील जमिनींचे दर गगनाला भिडले आहेत. त्यातच 'रेडीरेकनर'च्या दरात झालेली वाढ, लोखंड, सिमेंटच्या वाढलेल्या दरांमुळे या रस्त्याच्या खर्चात दीडपट वाढ झाली आहे. या प्रकल्पाचा सुधारित प्रस्ताव राज्य रस्ते विकास महामंडळाकडून येत्या आठवड्यात मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात येणार असल्याची माहिती उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली.

### भूमिपूजनाचा मुहूर्त ?

शहरातील वाहतूककोंडी फोडण्यासाठी राज्य सरकारने १६८ किलोमीटर लांबीचा आणि ११० मीटर रुंदीचा रिंग रोड साकारण्याचे ठरविले. सन २०१५ मध्ये या प्रस्तावाचा आराखडा तयार करून त्याचा अहवाल तयार करण्यात आला. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आणखी अडीच ते तीन वर्षे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याच्या किमतीत आणखी वाढ होईल, असा अंदाज आहे. आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात लागू होण्याची चर्चा सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर, मंत्रिमंडळाच्या येत्या बैठकीत सुधारित प्रस्तावाला मान्यता देऊन रिंग रोडच्या कामाचे करण्याचे नियोजन महामंडळाकडून सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयाकडून महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्याने हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे भूमिपूजन होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

---

## रिंग रोड'च्या खर्चात वाढ; नऊ वर्षांत खर्च ४२ हजार कोटींवर

### मंत्रिमंडळ लवकरच देणार मंजुरी, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची माहिती

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून रिंगरोड जाणार असल्याने या रस्त्याची आखणी झालेल्या भागातील जमिनींचे दर गगनाला भिडले आहेत. त्यातच 'रेडीरेकनर'च्या दरात झालेली वाढ, लोखंड, सिमेंटच्या वाढलेल्या दरांमुळे या रस्त्याच्या खर्चात दीडपट वाढ झाली आहे. या प्रकल्पाचा सुधारित प्रस्ताव राज्य रस्ते विकास महामंडळाकडून येत्या आठवड्यात मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात येणार असल्याची माहिती उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली. •



**भूमिपूजनाचा मुहूर्त ?**

शहरातील वाहतूककोंडी फोडण्यासाठी राज्य सरकारने १६८ किलोमीटर लांबीचा आणि ११० मीटर रुंदीचा रिंग रोड साकारण्याचे ठरविले. सन २०१५ मध्ये या प्रस्तावाचा आराखडा तयार करून त्याचा अहवाल तयार करण्यात आला. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आणखी अडीच ते तीन वर्षे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याच्या किमतीत आणखी वाढ होईल, असा अंदाज आहे. आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात लागू होण्याची चर्चा सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर, मंत्रिमंडळाच्या येत्या बैठकीत सुधारित प्रस्तावाला मान्यता देऊन रिंग रोडच्या कामाचे करण्याचे नियोजन महामंडळाकडून सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयाकडून महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्याने हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे भूमिपूजन होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

**भूसंपादन खर्चात वाढ**

पूर्वीच्या आराखड्यानुसार, २०१६-१७ मध्ये प्रकल्पाचा खर्च सुमारे १७ हजार कोटी रुपये होता. समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर शेतकऱ्यांना पाचपट मोबादला देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याने भूसंपादनाचा खर्च वाढला. सन २०१९-२० मध्ये भूसंपादनाचा खर्च पाच हजार कोटींवरून नऊ हजार कोटींवर पोहोचला आहे, तर हाच खर्च २०२४ मध्ये बारा हजार कोटींवर पोहोचला आहे.

### दीडपटीने खर्च

रिंग रोडसाठी १२ कंपन्यांनी निविदा प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यांनी दिलेल्या निविदेमध्ये २०१७ चे दर ग्राह्य न धरता बाजारभावानुसार, वाढीव दराने निविदा दिल्याने त्या निविदा वादग्रस्त ठरल्या होत्या. निविदांची दोन तटस्थ संस्थांकडून छाननी करण्यात आली. या दोन संस्थांकडून कमी जास्त प्रमाणात दर करून निविदा स्वीकारण्याची शिफारस करण्यात आली होती. कंपन्यांनी पूर्वीचे दर हे वाढीव असले तरी सध्याच्या बाजारभावाच्या जवळपास दर असल्याने निविदा स्वीकारण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे रिंग रोडच्या खर्चात पुन्हा वाढ झाल्याचे समोर आले आहे. २०१९-२० मध्ये प्रकल्पाचा २८ हजार कोटी रुपये खर्च होता. आता बाढलेले बांधकाम साहित्य, जीएसटीचा खर्च, वाहतूक खर्चामुळे आता ४२ हजार कोटी रुपयांपर्यंत खर्च पोहोचला आहे. म्हणजेच २०१५ मध्ये रिंग रोड प्रकल्पास सुरुवात झाली असली तरी नऊ-दहा वर्षांत प्रकल्पाचा खर्च दीडपटीने वाढला आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# लाडक्या बहिणींसाठी खुशखबर!

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी कोट्यवधी महिला पात्र

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांची जोरदार तयारी सुरु आहे. यातच सध्या अनेक नेत्यांचे राज्यभरात सभा आणि मेळावे सुरु आहेत. या मेळाव्याच्या माध्यमातून महायुतीचे नेते सरकारने राबववलेल्या योजनांची माहिती सांगत आहे.**



काही दिवसांपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलात आणली. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी राज्यातील कोट्यवधी महिला पात्र ठरल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांना जुलै पासून महिन्याला १५०० रुपये देण्यास सुरुवात झाली.राज्य सरकारने सर्वात आधी दोन महिन्यांचे एकत्र म्हणजे जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचे मिळून महिलांच्या खात्यावर तीन हजार रुपये जमा केले होते. त्यानंतर पुन्हा सप्टेंबर महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा करण्यात येत आहेत. अशातच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडक्या बहिणींना अजून एक मोठी खुशखबर दिली आहे. लाडक्या बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना आता ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असे दोन महिन्यांचे पैसे खात्यावर जमा होणार असून नोव्हेंबर महिन्यांचे पैसे देखील ऑक्टोबरमध्येच म्हणजे दिवाळीलाच जमा होणार आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे."मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना आधी दोन महिन्यांचे तीन हजार दिले. त्यानंतर आता लाडक्या बहिणींना सप्टेंबर महिन्याचे पैसे दिले आहेत. मात्र, आज मी तुम्हाला सांगतो ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी दिवाळी भाऊबीजेची ओवाळणी बहिणींच्या खात्यावर जमा होणार आहे, हा शब्द मी तुम्हाला देतो", असं अजित पवार यांनी एका सभेत बोलताना म्हटलं आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एका सभेला संबोधित करताना सांगितलं की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी म्हणजे भाऊबीजेलाच बहिणींच्या खात्यावर जमा होणार आहेत, असं अजित पवारांनी सांगितलं आहे.काही दिवसांपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलात आणली. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी राज्यातील कोट्यवधी महिला पात्र ठरल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांना जुलै पासून महिन्याला १५०० रुपये देण्यास सुरुवात झाली.राज्य सरकारने सर्वात आधी दोन महिन्यांचे एकत्र म्हणजे जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचे मिळून महिलांच्या खात्यावर तीन हजार रुपये जमा केले होते. त्यानंतर पुन्हा सप्टेंबर महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा करण्यात येत आहेत. अशातच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडक्या बहिणींना अजून एक मोठी खुशखबर दिली आहे. लाडक्या बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना आता ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असे दोन महिन्यांचे पैसे खात्यावर जमा होणार असून नोव्हेंबर महिन्यांचे पैसे देखील ऑक्टोबरमध्येच म्हणजे दिवाळीलाच जमा होणार आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

### किती तारखेला मिळणार पैसे?

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना आधी दोन महिन्यांचे तीन हजार दिले. त्यानंतर आता लाडक्या बहिणींना सप्टेंबर महिन्याचे पैसे दिले आहेत. मात्र, आज मी तुम्हाला सांगतो ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी दिवाळी भाऊबीजेची ओवाळणी बहिणींच्या खात्यावर जमा होणार आहे, हा शब्द मी तुम्हाला देतो", उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एका सभेला संबोधित करताना सांगितलं की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी म्हणजे भाऊबीजेलाच बहिणींच्या खात्यावर जमा होणार आहेत.

# भगिनींच्या लाभातून कपात करणाऱ्या बँकांवर कारवाई

## आदिती तटकरे यांनी तिसऱ्या हप्त्यासंदर्भातही माहिती दिली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. या योजनेच्या बळावर महायुती सरकारने आगामी विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी केली आहे. मात्र जसजसे महिने उलटत आहेत.**

तसे या योजनेतील काही तांत्रिक त्रुटी समोर येत आहेत.

सरकारकडूनही युद्ध पातळीवर या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. लाडकी बहीण योजनेचे पैसे बँक खात्यात आल्यानंतर बँक त्यातून शुल्क कपात करत असल्याची तक्रार अनेक महिलांनी केली होती. यानंतर आता सरकारने याबाबत कठोर पावले उचलली आहेत. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या संदर्भात माहिती दिली आहे. मंगळवारी (दि. १ ऑक्टोबर) 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचा राज्यस्तरीय आढावा घेण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेण्यात




आली. या बैठकीला महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, एकात्मिक बालविकास योजनेचे आयुक्त कैलास पगारे, सर्व जिल्ह्यातील महिला व बालविकास अधिकारी उपस्थित होते.लाभार्थी महिलांना देण्यात येणाऱ्या लाभातून काही बँकांकडून मिनिमम बॅलन्स, ईसीएस मँडेट रिटर्न, चेक रिटर्न यासारखे शुल्क आकारून महिलांच्या बँक खात्यातील लाभाची रक्कम कपात करून घेतली जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. अशा बँकांवर कारवाई करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. मदतनीस यांच्या मदतीने दि. २ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत विशेष मोहीम राबवावी, अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

### आदिती तटकरे काय म्हणाल्या?

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या तिसऱ्या हप्त्यासंदर्भातही माहिती दिली आहेमाझी लाडकी बहीण योजनेच्या लाभ हस्तांतरणाच्या तिसऱ्या टप्प्यात सुरुवात झाली असून दिनांक २९ सप्टेंबर रोजी ३४,७४,११६ भगिनींना ५२१ कोटी रुपयांचा लाभ हस्तांतरण करण्यात आला आहे. उर्वरित भगिनींना लाभ हस्तांतरणाची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू असून सर्व पात्र भगिनींना महिना अखेरपर्यंत लाभ मिळणार आहे. ज्या भगिनींना आधी लाभ मिळाला होता त्यांना तिसरा हफ्ता आणि ज्यांना आधी तांत्रिक अडचणींमुळे लाभ मिळाला नव्हता त्यांना यावेळेस तिन्ही हफ्ते एकत्र देण्यात आले आहेत.

## सुवर्णकार समाजाची भावना: आमदार महेश लांडगेच्या सहकार्यामुळे

# “आजि सोनियाचा दिनु..”!

## आर्थिक विकास महामंडळ निर्मितीची घोषणा

### 20 वर्षापासून प्रलंबित मागणीला मिळाला न्याय

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**सुवर्णकार समाज आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सोनार समाजातील युवकांना रोजगाराच्या संधी, बेरोजगारांना व्यवसायासाठी प्रोत्साहन, तसेच शिक्षणासाठी मदत होणार आहे. राज्यातील सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला. यासाठी आमदार महेश लांडगे यांनी यशस्वी पाठपुरावा केला, अशी माहिती अखिल भारतीय सोनार समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कैलास भांबुर्डेकर यांनी दिली.**




राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत दि. ३० सप्टेंबर रोजी हा निर्णय घेण्यात आला आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळातर्गंत हे महामंडळ असेल.

कैलास भांबुर्डेकर सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ बनवावे. यासाठी आम्ही गेल्या २० वर्षांपासून पाठपुरावा करीत होतो. मात्र, आमदार महेश लांडगे यांनी याबाबत राज्य सरकारकडे विषय लावून धरला. त्याला यश मिळाले.

सुवर्णकार समाजाकडे सधन आणि व्यावसायिक म्हणून पाहिले जाते. मात्र, सुवर्णकार समाजातील ७० ते ८० टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे. राज्यात २० ते २५ लाख इतकी समाजाची लोकसंख्या आहे. त्यामुळे समाजातील युवकांसाठी उद्योजकता, नोकरी व व्यावसाय यामध्ये प्रोत्साहन मिळावे. या करिता सुवर्णकार आर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे, अशी मागणी होती. मात्र, गेल्या २० वर्षापासून ही मागणी राज्य सरकारकडे प्रलंबित होती. अनेकदा आम्हाला आश्वासन देण्यात आले. मात्र, निर्णय झाला नव्हता. मात्र, विद्यमान सरकारने समाजाच्या हिताचा निर्णय घेतला आहे.

### समाजातर्फे आमदार लांडगे यांचे आभार...

भारतीय जनता पार्टी आणि महायुती सरकारच्या माध्यमातून सुवर्णकार समाजासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी. या करिता आम्ही अखिल भारतीय सुवर्णकार समाजाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून या मागणीला बळ मिळाले. या महामंडळाचे (उपकंपनी) मुख्यालय मुंबई येथे राहील. तसेच संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळाच्या योजना या उपकंपनीमार्फत राबवण्यात येतील. या उपकंपनीस पन्नास कोटींचे भागभांडवल देण्यात येईल. तसेच सोळा पदे भरण्यात येतील, असा निर्णय घेण्यात आला आहे, असेही अखिल भारतीय सोनार समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कैलास भांबुर्डेकर यांनी म्हटले आहे.

## चिंचवड विधानसभेत महाविकास आघाडीचा उमेदवार ठरला?

### नाना काटे यांच्या प्रचाराला संजोग वाघेरे मैदानात

**। चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

चिंचवड विधानसभेची जागा महाविकास आघाडी कडून कोणाला सुटणार हे अद्याप स्पष्ट झाले नाही. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते नाना काटे यांच्या प्रचाराकरिता शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजोग वाघेरे पाटील हे मैदानात उतरले आहेत. त्यामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.




संजोग वाघेरे पाटील हे नाना काटे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरल्यामुळे महाविकास आघाडीचा उमेदवार ठरला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळ रंगू लागली आहे. परंतु चिंचवडची जागा महाविकास आघाडीतून शरद पवार गटाला सुटली की उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला सुटली याबाबत अद्यापही निर्णय झाला नसला तरी नाना काटे हेच महाविकास आघाडीचे उमेदवार असतील अशी चर्चा रंगू लागली आहे.

नाना काटे यांनी ही निवडणूक लढणार असे मनसुबे त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र त्यांना पहिला पर्याय हा महाविकास आघाडीचा राहील असे संकेत देखील त्यांनी दिले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर सध्या काटे हे चिंचवड विधानसभा मतदारसंघ पूर्ण पिंजून टाकत आहेत.

राज्यातील महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटला नसला तरी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजोग वाघेरे पाटील यांनी थेट नाना काटे यांच्यासोबत प्रचारात उतरल्यामुळे ही जागा शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सुटली असल्याचे बोलले जात आहे.

आता नेमकी ही जागा महाविकास आघाडी कडून कोणाला सुटणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान अजित पवार गटातून भाऊसाहेब भोईर यांनी बंडाचा झेंडा हाती घेतला आहे. तर माजी नगरसेवक मयूर कलाटे, प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे, विनोद नढे यांनी थेट ही जागा न सुटल्यास आम्ही बंड पुकारू अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे नेमकी ही जागा कोणाला सुटणार? आणि तू जर कोण असणार? त्यावरच पुढील महाविकास आघडीचे भवितव्य अवलंबून असून सर्वांची उत्सुकता शिगेला लागली आहे.

## थकबाकीदार महापालिकेच्या रडारवर

### सहा महिन्यांत 505 कोटींचा मालमत्ता कर जमा

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने २०२४-२५ या आर्थिक वर्षातील पहिल्या सहामहीत ५०५ कोटींचा कर वसूल केला आहे. तीन लाख ९० हजार मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा सहा लाख ३२ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटिसा, नळजोड बंद करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून देयकांचे घरपोच वाटप केले. यामुळे २०२३-२४ च्या पहिल्या सहामाहीत ५८० कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात विभागाला यश आले होते. मात्र, यंदा पहिल्या सहामाहित कर वसुली कमी झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे.




सहा लाख ३२ हजार मालमत्ता धारकांपैकी तीन लाख ९० हजार ३० मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत सहा महिन्यांत कराचा भरणा केला आहे. या मालमत्ता धारकांनी ५०५ कोटी नऊ लाख ७९ हजार रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. ऑनलाइन माध्यमातून ३५३ कोटी १३ लाख, विविध उपयोजन १३ कोटी २५ लाख, रोख स्वरूपात ३८ कोटी ९६ लाख, धनादेशाद्वारे ३२ कोटी ३९ लाख, आरटीजीएसद्वारे २० कोटी ११ लाख, डिमांड ड्राफ्टद्वारे एक कोटी ८९ लाख रुपये जमा झाले आहेत. दरम्यान, तीन लाख ९० हजार ३० मालमत्ता धारकांपैंकी तीन लाख ४३ हजार ५६ निवासी मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. ३२ हजार ३३८ बिगर निवासी, ८६७६ मिश्र, २९८१ औद्योगिक तर २९७५ मोकळ्या जमीन असणाऱ्या मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. सहा महिन्यांत ६० टक्यांपेक्षा जास्त मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. यापुढील काळात थकबाकीदारांचा कर वसूल करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. थकीत आणि चालू कर शंभर टक्के वसुली करण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी सांगितले.



भूमिका

# अदानींसाठी कायदे पायदळी!

**सौरवीज ५,००० मेगॅवॅट्स आणि औष्णिक (कोळसा) वीज १,६०० मेगॅवॅट्स, असा एकूण ६,६००मेगॅवॅट्सचा संयुक्त प्रकल्प अदानी यांच्या कंपनीला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने नुकताच दिला आहे. त्याचे वीजनिर्मिती-पुरवठ्याच्या अर्थतांत्रिक गणिताच्या आधारे केलेले वस्तुनिष्ठपणे परीक्षण...**

वीजेची एकूण मागणी ही २४ तास समान नसते. संध्याकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत कमाल मागणी असते. रात्री १२ ते सकाळी ६ ती सर्वांत कमी असते. त्यानंतर ती वाढत जाते. मात्र कोळसाविद्युत प्रकल्प २४ तास चालवावेच लागतात. मागणीप्रमाणे चालू-बंद करता येत नाहीत. तसेच कोळशाच्या किमती या वाढत्या असतात. किंवा खरे-खोटेपणाने वाढविल्या जाऊ शकतात. त्यामुळे कोळसावीज प्रकल्पातील वीजेची प्रतियुनिट किंमत कायम वाढती असते. प्रकल्पामुळे होणारे प्रदूषण तसेच आणि मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठ्याची गरज हे घटक पर्यावरणास हानीकारक ठरतात. मात्र सौर ऊर्जाप्रकल्पाचा प्रत्यक्ष क्षमता वापर हा भारतात एकूण क्षमतेच्या साधारणतः २५ टक्के, तर पवनउर्जाप्रकल्पाचा ३३ टक्के इतकाच असू शकतो. ही वेळ दिवसाची असल्याने त्यावेळी वीजेचा पुरवठा हा मागणीपेक्षा जास्त असतो. दिवसातील सहा तास सौरउर्जा मागणीपेक्षा जादा प्रमाणात झाल्यामुळे ती



साठविण्यासाठी बॅटरीव्यवस्थेची किंमतदेखील मोजावी लागते. मात्र सौर किंवा पवनउर्जाप्रकल्प एकदा स्थापित झाला की, त्याला कोणताही इंधनखर्च नसतो. एकदा त्याची किंमत ठरली की, त्यात एक नवा पैसादेखील वाढ प्रकल्पाच्या संपूर्ण आयुष्यात म्हणजे किमान २५ वर्षांत गरजेची नसते. हे त्याचे महत्त्वाचे लाभ आहेत.हे कंत्राट देताना महाराष्ट्र सरकार मोदी-शहा-अदानी यांच्या आदेशानुसारच कसे काम करत होते, याचा प्रशासकीय पुरावा म्हणजे निविदा काढण्याची प्रक्रिया आणि तारखा. वीज कायदा २००३ आणि वीज नियामक आयोगाचे अधिकार याविषयीच्या कायदेशीर तरतूदीनुसार, अशा प्रकल्पाचे कंत्राटासाठी निविदा काढताना वीज नियामक आयोगाची पूर्वसंमती घेणे, वीज वितरण कंपनीवर बंधनकारक होते. पण तरीही निविदा जाहीर करून कंपन्यांकडून प्रस्ताव मागविले १३ मार्च २०२४ रोजी आणि त्यासाठी मान्यतेचा अर्ज केला, १६ जून २०२४ रोजी! २५ जून रोजी त्याची तातडीची सुनावणी झाली, आणि १२ जुलै रोजी आयोगाने किंचितशी नाराजी दाखवत अदानींना द्यायच्या निविदेला “पश्चातमान्यता” दिली. त्यातही गंमत अशी की, या निविदा मागविताना सरकारला इतकी घाई होती की, स्वतः केंद्राच्या उर्जाखात्याच्या मार्गदर्शक सूचनांपासून पूर्ण फारकत घेतली गेली आहे. कारण त्यात संयुक्त प्रकल्पाला मान्यताच नाही. या अभूतपूर्व प्रकाराचे स्पष्टीकरण देताना महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीने नियामक आयोगासमोर कबूल केले की, मे महिन्यामध्ये असणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होणार असल्याने त्यापूर्वी निविदा काढायच्या होत्या. म्हणून प्रथम आयोगाकडे अर्ज सादर केला नाही.२०३०-३१ पर्यंतच्या मागणीचा स्वतः वीज वितरण कंपनीने बांधलेला अंदाज मान्य केला तरी, सौर आणि कोळसा अशा संयुक्त प्रकल्पाचे एकत्र कंत्राट देण्याचे काहीही समर्थन नाही. कारण सौर आणि कोळसा वीजनिर्मिती यांचा परस्परांशी काहीही संबंधच नाही. किंबहुना उपलब्ध सर्व पर्याय आणि त्यांच्या कमी किमतींचा विचार करता, कोळशाच्या नव्या प्रकल्पाची महाराष्ट्राला गरजच नाही. त्यातही, दोन्हींसाठी एकत्र निविदा मागविण्याचे कोणतेही कारण असूच शकत नाही. उलट स्वतंत्र निविदा मागविणे हेच स्पर्धात्मकतेसाठी अत्यावश्यक होते, पण तरीही किमतींच्या लाभ-हानीचा आणि महाराष्ट्राच्या गरजेचा विचार न करता संयुक्तच निविदा मागविल्या. कारण दोन्ही प्रकारच्या वीजनिर्मितीचे मोठे कंत्राट एकत्र घेऊ शकतील, ही शक्यता फक्त अदानींसाठीच होती आणि त्यांना कंत्राट द्यायचेच असे आधीच ठरलेले होते. हे स्पष्ट आहे.निविदेमध्ये ५,००० मेगॅवॅट्सचा सौर उर्जाप्रकल्प महाराष्ट्रातच साकारायला हवा, अशी अटच नव्हती. म्हणजे तेथील जमिनीला भाव मिळणे किंवा काही प्रमाणात रोजगारनिर्मिती इत्यादी कोणतेही अनुषंगिक आर्थिक लाभ महाराष्ट्राच्या पदरात न पडता ते गुजरातलाच मिळणार आहेत.

## प्रासंगिक »

### राज्यमाता

***सावरकर गायीस केवळ ‘उपयुक्त पशु’ असे म्हणतात? ‘राज्यमाते’चा किती हा अपमान? यवनही तो आता करू धजणार नाहीत...***

हा शाहू- फुले- आंबेडकर यांचा महाराष्ट्र यापुढच्या काळात शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांचा- अलीकडचा लोकप्रिय राजकीय शब्दप्रयोग करायचा तर- आभाळभर ऋणी राहील. या ऋणातून उतराई कसे व्हावे हे पुढच्या कित्येक पिढ्यांना कळणार नाही; इतके हे ऋण मोठे आहे. त्याचा संबंध या शंकराचार्यांनी आधी ‘मातोश्री’वर पायधूळ झाडून, तेथील पाहुणचार झोडून, पोटभर आशीर्वाद देऊन नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही तसेच आशीर्वाद दिले या त्यांच्या धार्मिक चातुर्याशी अजिबात नाही. असे सर्व डगरींवर एकाच वेळी पाय रोवून उभे राहता येणे यालाच अध्यात्म असे म्हणत असावेत. आणि असेही आत्मा एक आहे, असे म्हणतातच. तेव्हा ‘मातोश्री’वर केलेली आशीर्वादवर्षा ‘वर्षा’वासीयावरही केली तर कुठे बिघडते असाही स्थूलातून सूक्ष्मात जाणारा विचार शंकराचार्यांनी केला असणार. या ऋणाचा संबंध आपणास आणखी एक शंकराचार्य प्राप्त झाले.

न्यायालयीन प्रक्रिया सर्वसामान्य माणसाला अनाकलनीय वाटते असं म्हटलं जातं, अर्थात ती आहेच. मात्र दोन वकिलांमधील वाद-युक्तिवाद, संघर्ष, आरोपीचे अनिश्चित भवितव्य, भडक पुरावे, त्यांचे खंडन या आणि यांसारख्या अनेकविध कारणांनी न्यायालयीन खटले सामान्य माणसांना आकर्षित करतात.

# न्यायालयातील वर्तनाचा समाजमाध्यमी पंचनामा

त्यांचे मनोरंजन करतात, उत्सुकता निर्माण करतात. शेक्सपियरचे द मर्चंट ऑफ व्हेनिस, डिकन्सचे ब्लेक हाऊस, काफ्काची द ट्रायल, हार्पर ली यांची ‘टु किल अ मॉकिंगबर्ड’ असो किंवा जॉन ग्रीशमच्या बेस्टसेलर कादंबऱ्या असोत, न्यायालयीन प्रक्रियेवर भरपूर कथा-कादंबऱ्या आहेत. ‘कोर्टरूम ड्रामा’ दाखवणारे नाटक, सिनेमे, ओटीटी प्लॅटफॉर्मवरील सिरिजही विपुल प्रमाणात आहेत. हे झालं काल्पनिक कथांमधलं. मात्र प्रत्यक्षातील खटल्यामध्ये जर गुन्हा अत्यंत भयानक असेल किंवा एखाद्या सेलेब्रिटीचा असेल तर त्याला अधिकची प्रसिद्धी मिळते. लोक चवीचवीनं त्याची चर्चा करतात, पुढे काय घडणार याचे आडाखे बांधतात. प्रेक्षकांना ते रंजक वाटतं म्हणून प्रसारमाध्यमेही आपल्या पदरचा मसाला घालून समांतर ‘मीडिया ट्रायल’ चालवण्याचा गैरप्रकार करतात. यात अधिकची भर घातली



आहे, ती सोशल मीडियाने!२०१८ च्या ‘स्वप्नील त्रिपाठी केस’चा निकाल देताना त्यावेळचे सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्या. अजय खानविलकर आणि न्या. धनंजय चंद्रचूड यांनी घटनात्मक आणि देशपुढील महत्त्वाच्या खटल्यांच्या सुनावण्यांचं जाहीर प्रसारण केलं जावं हे एकमतानं मान्य केलं. सप्टेंबर २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या ई-कमिटीनं पारदर्शकता, सर्वसमावेशकता, न्यायाची संधी उपलब्ध करून देणाच्या हेतूने कोर्टाच्या प्रक्रियेचे जाहीर प्रसारण आणि रेकॉर्डिंग सुरू केलं. त्या संबंधी मार्गदर्शक नियम बनवले. सध्याच्या घडीला सर्वोच्च न्यायालय आणि निवडक उच्च न्यायालयांच्या कामकाजाचं जाहीर प्रसारण आणि रेकॉर्डिंग केलं जातं. ही कायद्याचे विद्यार्थी, वकील, न्यायिक प्रक्रियेत रस असलेले लोक यांच्यासाठी मोठी उपलब्धी आहे. देशाच्या मोठ्या कोर्टांतील न्यायमूर्ती, बडे वकील यांच्यातील वाद-संवाद-युक्तिवाद, त्यांची बोलण्याची तऱ्हा हे अगदी सहजगत्या पाहायला मिळतं.पण कोर्टाच्या प्रक्रियेचे जाहीर प्रसारण आणि सोशल मीडिया यांचा संयोग मात्र विचित्र ठरतो आहे. अनेक न्यायाधीश त्यांच्या बऱ्या-वाईट शेऱ्यांमुळे व्हायरल होत आहेत. ‘जेन झी’च्या भाषेत याला ‘मीम मटेरियल’ म्हटले जाते, तसे! सोशल मीडियावर – खास करून इन्स्टाग्राम आणि यूट्यूबवर अनेक हँडल्स आहेत, ज्यावर फक्त कोर्ट रूमवरील मीम/ रील्स/ क्लिप आकर्षक टायटल, थम्बनेल देऊन शेअर केले जातात. अर्थात प्रस्थापित मीडिया चॅनेलवरूनही क्लिप आकर्षक टायटल, थम्बनेल देऊन शेअर केल्या जातात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# शरद पवारांची सर्वोच्च न्यायालयात धाव!

## निवडणुकीची तारीख या आठवड्यात जाहीर होऊ शकते

। बीड ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने अजित पवार यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विधानसभा निवडणुकीची तारीख या आठवड्यात जाहीर होऊ शकते. त्याआधीच शरद पवार यांनी अजित पवार यांची कोंडी करण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पवारांच्या पक्षाने सर्वोच्च न्यायालयाकडे ही विनंती केली आहे की महाराष्ट्रातील निवडणुकीच्या आधी घड्याळ चिन्ह गोठवावं.**



हे चिन्ह अजित पवार यांच्या पक्षाला मिळू नये. सर्वोच्च न्यायालय याबाबत काय निर्णय घेणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. मात्र शरद पवारांच्या पक्षाच्या बाजूने निर्णय आला तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीची निवडणुकीत अडचण होणार आहे यात शंका नाही.शरद पवार यांच्या पक्षातर्फे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. यामध्ये घड्याळ हे राष्ट्रवादी काँग्रेसचं चिन्ह म्हणून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देऊ नये. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हे चिन्ह त्यांना मिळू नये त्याऐवजी नवं चिन्हं द्यावं अशी मागणी केली आहे. अजित पवारांच्या पक्षाने नव्या चिन्हासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज करावा आणि त्यांच्याकडून मिळालेल्या चिन्हावर निवडणूक लढावी अशी मागणीही या अर्जात करण्यात आली आहे ने हे वृत्त दिलं आहे.जुलै २०२३ या महिन्यात अजित पवार यांनी ४१ आमदारांना बरोबर घेऊन बंड केलं आणि आपणच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आहोत असा दावा केला. त्यामुळे शरद पवारांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या पक्षाचे दोन तुकडे पडले. ज्यात शरद पवारांचा ( SHARAD PAWAR ) राष्ट्रवादी पक्ष विरोधात राहिला तर अजित पवारांचा राष्ट्रवादी पक्ष सत्तेत गेला. हा वाद जेव्हा निवडणूक आयोगापुढे गेला होता तेव्हा अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे पक्षचिन्ह निवडणूक आयोगाने दिलं होतं. त्यानंतर आता शरद पवार यांनी हे चिन्ह गोठवण्यात यावं आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला नवं चिन्हं द्यावं अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे.शरद पवारांनी ( SHARAD PAWAR ) निवडणूक आयोगाने घड्याळ हे पक्षचिन्ह आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव अजित पवारांना देण्याचा निर्णय घेतला आहे त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. जर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात शरद पवारांच्या बाजूने निर्णय दिला आणि चिन्ह गोठवलं तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची अडचण चांगलीच वाढू शकते. ज्यावेळी चिन्ह आणि पक्ष कुणाचा आहे हा वाद निवडणूक आयोगाच्या दारात गेला तेव्हा त्यांनी अजित पवार हेच पक्षाचे सर्वेसर्वा आहेत असा निकाल देत त्यांना घड्याळ हे पक्षचिन्ह आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव दिलं. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे नाव दिलं होतं. आता ऐन निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांची कोंडी करण्यासाठी शरद पवारांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.हे चिन्ह अजित पवार यांच्या पक्षाला मिळू नये. सर्वोच्च न्यायालय याबाबत काय निर्णय घेणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. मात्र शरद पवारांच्या पक्षाच्या बाजूने निर्णय आला तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीची निवडणुकीत अडचण होणार आहे यात शंका नाही.शरद पवार यांच्या पक्षातर्फे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. यामध्ये घड्याळ हे राष्ट्रवादी काँग्रेसचं चिन्ह म्हणून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देऊ नये. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हे चिन्ह त्यांना मिळू नये त्याऐवजी नवं चिन्हं द्यावं अशी मागणी केली आहे. निवडणूक लढावी अशी मागणीही या अर्जात करण्यात आली आहे ने हे वृत्त दिलं आहे.जुलै २०२३ या महिन्यात अजित पवार यांनी ४१ आमदारांना बरोबर घेऊन बंड केलं आणि आपणच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आहोत असा दावा केला. त्यामुळे शरद पवारांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या पक्षाचे दोन तुकडे पडले.

### अजित पवारांची कोंडी

ज्यात शरद पवारांचा राष्ट्रवादी पक्ष विरोधात राहिला तर अजित पवारांचा राष्ट्रवादी पक्ष सत्तेत गेला. हा वाद जेव्हा निवडणूक आयोगापुढे गेला होता तेव्हा अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे पक्षचिन्ह निवडणूक आयोगाने दिलं होतं. त्यानंतर आता शरद पवार यांनी हे चिन्ह गोठवण्यात यावं आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला नवं चिन्हं द्यावं अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे.निवडणूक आयोगाने घड्याळ हे पक्षचिन्ह आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव अजित पवारांना देण्याचा निर्णय घेतला आहे त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. जर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात शरद पवारांच्या बाजूने निर्णय दिला आणि चिन्ह गोठवलं तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची अडचण चांगलीच वाढू शकते.

# राहुल गांधी दोन दिवसीय कोल्हापूर दौऱ्यावर

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण करणार

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस नेते, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते तथा खासदार राहुल गांधी येत्या शुक्रवारी व शनिवारी (४ व ५ ऑक्टोबर रोजी) कोल्हापूर दौऱ्यावर जाणार आहेत. खासदार राहुल गांधी यांच्या हस्ते छत्रपती पुतळ्याचे अनावरण होणार असून शनिवारी होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहणार असल्याची माहिती विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते व आमदार सतेज पाटील यांनी दिली.**



खासदार राहुल गांधी यांच्या हस्ते ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा भव्य अनावरण सोहळा होणार आहे. ५ ऑक्टोबर रोजी खासदार राहुल गांधी हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळी भेट देऊन अभिवादन करतील. त्यानंतर हॉटेल सयाजी येथे होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहतील, अशी माहिती आमदार पाटील यांनी दिली.४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता कोल्हापूर विमानतळ येथे आगमन आणि कसबा कार्यक्रम स्थळी कडे प्रस्थान, प्रवासाचा मार्ग : कोल्हापूर विमानतळ – शाहू नाका – शिवाजी विद्यापीठ – कावळा नाका – धैर्यप्रसाद चौक – पोलीस उपअधीक्षकांचं कार्यालय – भगवा चौक, कसबा बावडा. सायंकाळी ६ वाजता – कसबा बावडा येथील समारंभ संपल्यानंतर हॉटेल सयाजीकडे प्रयाण आणि मुक्काम.

### पुतळ्याचा भव्य अनावरण सोहळा

काँग्रेस नेते, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते तथा खासदार राहुल गांधी येत्या शुक्रवारी व शनिवारी (४ व ५ ऑक्टोबर रोजी) कोल्हापूर दौऱ्यावर जाणार आहेत. खासदार राहुल गांधी यांच्या हस्ते ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा भव्य अनावरण सोहळा होणार आहे. ५ ऑक्टोबर रोजी खासदार राहुल गांधी हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळी भेट देऊन अभिवादन करतील. त्यानंतर हॉटेल सयाजी येथे होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहतील

# झाकीरसाठी पाकिस्तानच्या पायघड्या!

## भारताचा हा शत्रू पुढील काही दिवस पाकिस्तानात राहणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**स्वयंघोषित इस्लामिक धर्मगुरू आणि अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेला आरोपी झाकीर नाईक पाकिस्तानात दाखल झाला आहे. पाकिस्तानात त्याचं भव्यदिव्य स्वागत करण्यात आलं. तिथे त्याची भेट घेण्यासाठी अनेक मोठ्या नेत्यांनी रांग लावल्याचं पाहायला मिळालं.**



### लाहोरमधील जनतेला संबोधित करणार

दरम्यान, पाकिस्तान मुस्लीम लीगचे नेते व पंतप्रधान शहबाज शरीफ यांचे निकटवर्ती म्हणून ओळखले जाणारे राणा मशहूद, धार्मिक व्यवहार मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव सय्यद अला-उर-रहमान, धार्मिक व्यवहारांचे संसदीय सचिव शमशेर मजारी आणि इतर अनेक नेते तथा अधिकारी नाईकच्या स्वागतासाठी इस्लामाबाद विमानतळावर हजर होते.पाकिस्तानचे उपपंतप्रधान मोहम्मद इशाक डार यांनी देखील नाईकची भेट घेतली आहे. नाईकने डार यांच्याबरोबरचे फोटो समाजमाध्यमांवर शेअर केले आहेत. झाकीर नाईक हा इस्लामाबाद, कराची आणि लाहोरमधील जनतेला संबोधित करणार आहे. नाईक २०१६ पासून मलेशियात राहतोय. मलेशियन सरकारनेनाईकचं भारताला प्रत्यार्पण करावं यासाठी भारत सरकार प्रयत्न करत आहे

झाकीर नाईक हा भारतातील मॉस्ट वॉन्टेड गुन्हेगारांच्या यादीतला एक गुन्हेगार आहे. भारताचा हा शत्रू पुढील काही दिवस पाकिस्तानात राहणार असून तिथे वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहे. दरम्यान, झाकीर नाईक याने नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा भारताविरोधात गरळ ओकली आहे. भारतातील प्रस्तावित वक्फ बोर्ड विधेयकाविरोधात सर्व मुस्लिमांनी एकत्र येण्याचं त्याने आवाहन केलं आहे. तसेच गोमांसावर मोठं वक्तव्य केलं आहे. पाकिस्तानमध्ये झाकीर नाईकच्या स्वागतासाठी रेड कार्पेट अंथरण्यात आलं आहे. सोमवारी (३० सप्टेंबर) तो पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये दाखल झाला आहे. तो २८ ऑक्टोबरपर्यंत पाकिस्तानमध्येच मुक्काम करणार आहे. दरम्यान, पाकिस्तान मुस्लीम लीगचे नेते व पंतप्रधान शहबाज शरीफ यांचे निकटवर्ती म्हणून ओळखले जाणारे राणा मशहूद, धार्मिक व्यवहार मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव सय्यद अला-उर-रहमान, धार्मिक व्यवहारांचे संसदीय सचिव शमशेर मजारी आणि इतर अनेक नेते तथा अधिकारी नाईकच्या स्वागतासाठी इस्लामाबाद विमानतळावर हजर होते.पाकिस्तानचे उपपंतप्रधान मोहम्मद इशाक डार यांनी देखील नाईकची भेट घेतली आहे. नाईकने डार यांच्याबरोबरचे फोटो समाजमाध्यमांवर शेअर केले आहेत. झाकीर नाईक हा इस्लामाबाद, कराची आणि लाहोरमधील जनतेला संबोधित करणार आहे. नाईक २०१६ पासून मलेशियात राहतोय. मलेशियन सरकारने झाकीर नाईकचं भारताला प्रत्यार्पण करावं यासाठी भारत सरकार प्रयत्न करत आहे.दरम्यान, इस्लामाबादमधील एका कार्यक्रमावेळी प्रसारमाध्यमाच्या एका प्रतिनिधीने झाकीर नाईक याला विचारलं की भारतात गोमांसावर बंदी घालण्यात आली असून तिथल्या मुसलमानांनी या बंदीचं पालन करायला हवं का? त्यावर नाईक म्हणाला, यावर माझं एक वैयक्तिक मत आणि एक इस्लामिक मत आहे. इस्लामिक शरीयतनुसार तुम्ही ज्या देशात राहता त्या देशाचे कायदे पाळले पाहिजेत. परंतु, तो देश अल्लाह व पैगंबरांच्या नियमांच्या विरोधात नाही ना, हे तपासायला हवं. उदाहरणार्थ, एखाद्या देशाने नमाजवर बंदी घातली तर तो कायदा मानता येणार नाही. कारण इस्लाममध्ये नमाज पठण करणं अनिवार्य आहे.भारतातील गोमांसावरील बंदी हा राजकीय मुद्दा आहे. खरंतर कोट्यवधी हिंदू देखील गोमांस खातात.झाकीर नाईक हा भारतातील मॉस्ट वॉन्टेड गुन्हेगारांच्या यादीतला एक गुन्हेगार आहे. भारताचा हा शत्रू पुढील काही दिवस पाकिस्तानात राहणार असून तिथे वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहे. दरम्यान, झाकीर नाईक याने नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा भारताविरोधात गरळ ओकली आहे. भारतातील प्रस्तावित वक्फ बोर्ड विधेयकाविरोधात सर्व मुस्लिमांनी एकत्र येण्याचं त्याने आवाहन केलं आहे. तसेच गोमांसावर मोठं वक्तव्य केलं आहे. पाकिस्तानमध्ये झाकीर नाईकच्या स्वागतासाठी रेड कार्पेट अंथरण्यात आलं आहे. सोमवारी (३० सप्टेंबर) तो पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये दाखल झाला


# आम्ही कुणालाही संन्यासी व्हायला सांगत नाही

## जग्गी वासुदेव यांच्या 'इशा फाउंडेशन'चं आरोपांवर स्पष्टीकरण!

। नवी दिल्ली ।
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**सदगुरू जग्गी वासुदेव यांच्या 'इशा फाउंडेशन'बाबत गेल्या काही दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा चालू आहे. भारतासह जगभरात अनुयायी असणाऱ्या इशा योगा केंद्राविरोधात एका निवृत्त प्राध्यापकानं मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्याबाबत न्यायालयात रीतसर सुनावणी चालू आहे.**

दुसरीकडे कारवाईचा भाग म्हणून देशभरातील इशा योगा केंद्राच्या काही शाखांवर मंगळवारी संध्याकाळी छापेही टाकण्यात आले. आता या सर्व प्रकरणावर ईशा फाउंडेशनकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. ईशा फाउंडेशनचे संस्थापक सदगुरू जग्गी वासुदेव यांच्यावर तमिळनाडूतील माजी प्राध्यापक एस. कामराज यांनी याचिका दाखल केली आहे. त्यांच्या दोन मुलींना ईशा फाउंडेशनमध्ये ब्रेनवॉशिंग करून ठेवण्यात आल्याचा दावा याचिकेमध्ये करण्यात आला आहे. तसेच, आपल्या मुलींना संसारात न रमता परमार्थ व संन्यासी जीवन जगण्याबाबत सांगण्यात आल्याचाही दावा याचिकेत



### ईशा फाऊंडेशनचं स्पष्टीकरण

"याआधी याच याचिकाकर्त्यांनी इतर काही लोकांसमवेत आमच्या केंद्राच्या परिसरात खोटं सांगून प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी त्यांनी इशा फाउंडेशनतर्फे बांधण्यात येणाऱ्या दफनभूमीबाबतची माहिती तपासणाऱ्या समितीचे सदस्य असल्याचं त्यांनी सांगितलं होतं. त्यानंतर त्यांनी इशा योगा केंद्राच्या सदस्यांविरोधात फौजदारी स्वरूपाची तक्रार दाखल केली. यावर मद्रास उच्च न्यायालयानं पोलिसांचा अंतिम अहवाल सादर करण्यावर स्थगिती आणली आहे.

करण्यात आला. त्यावर सुनावणीदरम्यान न्यायालयाने "एक इसम ज्यांनी स्वतःच्या मुलीचं लग्न लावून दिलं आहे. त्याची मुलगी इतर लोकांप्रमाणे संसारिक जीवन जगत आहे. तो इसम इतरांच्या मुलींना केशवपन करण्यासाठी व संन्यासी जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित का करतोय?" असा प्रश्नही सदगुरू जग्गी वासुदेव यांना विचारला.दरम्यान, आता ईशा फाउंडेशनकडून स्पष्टीकरण देण्यात आलं असून एएनआयनं त्याबाबत माहिती दिली आहे. "लोकांमध्ये अध्यात्म व योगाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी सदगुरूंनी इशा फाउंडेशनची स्थापना केली होती. आमचा असा विश्वास आहे की प्रगल्भ व्यक्तींकडे त्यांचा मार्ग निवडण्याचं स्वातंत्र्य व सदसदविवेकबुद्धी असते. आम्ही कुणालाही लग्न करायला किंवा संन्यास घ्यायला सांगत नाही. कारण या पूर्णपणे वैयक्तिक निवडीच्या बाबी आहेत. इशा योगा केंद्रामध्ये संन्यास न स्वीकारलेले हजारो लोक आहेत. त्याशिवाय, ब्रह्मचर्य स्वीकारलेले किंवा संन्यासी झालेलेही काही आहेत", असं या जाहीर निवेदनात नमूद करण्यात आलं आहे.



# शारदीय नवरात्रीचे नऊ दिवस, नवरंगांचे महत्त्व!

## भारतीय घरांमध्ये नवरात्री उत्सवाला महत्त्वाचे स्थान

पुणे । वृत्तसंस्था

**हिंदू धर्मातील सर्वात मोठा सण शारदीय नवरात्रीला उद्यापासून म्हणजेच 3 ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे. नवरात्रीच्या 9 दिवसांमध्ये दुर्गा देवीच्या 9 रूपांची पूर्ण विधीपूर्वक पूजा केली जाते. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी एका शुभ मुहूर्तावर घटस्थापना केली जाते. आणि त्यानंतर संपूर्ण 9 दिवस दुर्गेच्या 9 वेगवेगळ्या रूपांची भक्तिभावाने पूजा केली जाते. नवरात्रीत 9 दिवस अखंड ज्योतही प्रज्वलित केली जाते. दुर्गादेवीला प्रसन्न करण्यासाठी बरेच जण 9 दिवस उपासही करतात. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापना करण्याची शुभ वेळ कोणती, मुहूर्त कधी पर्यंत आहे, योग्य पद्धत काय, हे सर्व जाणून घेऊया.**

### घट स्थापनेचा शुभ मुहूर्त

शारदीय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेसाठी दोन शुभ मुहूर्त आहेत. घटस्थापनेसाठी पहिली शुभ वेळ सकाळी 6 वाजून 15 मिनिटं ते 7 वाजून 22 मिनिटांपर्यंत आहे. तुम्हाला घटस्थापना साठी 1 तास 6 मिनिटे वेळ मिळेल. घटस्थापनेचा दुसरा मुहूर्तही दुपारी आहे. हा मुहूर्त सर्वोत्तम मानला जातो. तुम्ही दिवसभरात सकाळी 11 वाजून 46 मिनिटे ते दुपारी 12 वाजून 33 मिनिटांपर्यंत दरम्यान कधीही घटस्थापना करू शकता. कलशाची स्थापना करण्यासाठी मातीच्या भांड्यात माती टाकावे, त्यात सात प्रकारचे धान्य टाकावे व मातीचे तीन थर करावेत. कलशात गंगाजल भरून त्याला मौली धागा बांधावा. या पाण्यात सुपारी, अक्षत आणि नाणे टाकल्यानंतर कलशाच्या काठावर आंब्याची किंवा अशोकाची पाने 5 ठेवावीत, त्यानंतर नारळावर लाल कपडा बांधून कलशावर ठेवावा आणि कलश गुंडाळावा. हा कलश माता दुर्गेच्या पूजेसाठी स्थापित करावा.



### 9 नवरात्रीचे रंग 2024 आणि नवरात्रीच्या रंगांचे महत्त्व

- 3 ऑक्टोबर 2024, गुरुवार - पिवळा रंग
- 4 ऑक्टोबर 2024, शुक्रवार - हिरवा रंग
- 5 ऑक्टोबर 2024, शनिवार - राखाडी रंग
- 6 ऑक्टोबर 2024, रविवार - नारिंगी रंग
- 7 ऑक्टोबर 2024, सोमवार - पांढरा रंग
- 8 ऑक्टोबर 2024 मंगळवार - लाल रंग
- 9 ऑक्टोबर 2024 बुधवार - निळा रंग
- 10 ऑक्टोबर 2024 गुरुवार - गुलाबी रंग
- 11 ऑक्टोबर 2024 शुक्रवार - जांभळा रंग
- 12 ऑक्टोबर शनिवार - मोरपंखी रंग

# सर्फराझ खानने झळकावले द्विशतक!

## 255 चेंडूत 23 चौकार आणि 3 षटकारांसह 200 धावा केल्या

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**मुंबई क्रिकेट संघाचा विस्फोटक फलंदाज सर्फराझ खानने द्विशतक झळकावले आहे. सध्या सुरू असलेल्या इराणी कप २०२४ मध्ये मुंबई क्रिकेट संघाकडून खेळताना सर्फराझ खानने द्विशतक केले. मुंबई वि रेस्ट ऑफ इंडिया सामन्यात सर्फराझने २५५ चेंडूत २३ चौकार आणि ३ षटकारांसह २०० धावा केल्या. बांगलादेशविरुद्ध नुकत्याच झालेल्या कसोटी मालिकेत सर्फराझ खानला भारतीय संघात संधी मिळाली होती. मात्र त्याला प्लेईंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले नाही. मात्र, आता त्याने इराणी चषकात आपल्या कामगिरीने खळबळ उडवून दिली.**



सर्फराझ खान डावाच्या सुरुवातीपासूनच चांगल्या लयीत होता आणि कोणतीही जोखीम न घेता त्याने अवघ्या १५० चेंडूत आपले शतक पूर्ण केले. त्याने कर्णधार अजिंक्य रहाणेबरोबर उत्कृष्ट भागीदारी रचली, ज्यामुळे मुंबई संघाला कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्यात तो यशस्वी ठरला. त्याने अवघ्या २५३ चेंडूत २०० धावा पूर्ण केल्या आणि यादरम्यान त्याने २३ चौकार आणि तीन षटकार लगावले. त्याच्यामुळेच मुंबईचा संघ मोठी धावसंख्या गाठण्यात यशस्वी ठरला आहे.१ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या इराणी चषकाच्या सामन्यात मुंबई आणि रेस्ट ऑफ इंडिया संघ आमनेसामने आहेत. या सामन्यात मुंबईने झटपट ४ विकेट लवकर गमावल्या. या सामन्यात मुंबईची सुरुवात खूपच खराब झाली. सलामीवीर पृथ्वी शॉ ७ चेंडूत ४ धावा करून बाद झाला. यानंतर संघाने ३७ धावांत ३ विकेट गमावल्या. मात्र, त्यानंतर रहाणे आणि सर्फराझने जबाबदारी स्वीकारली आणि मुंबईसाठी मोठी भागीदारी केली. रहाणेचे शतक ३ धावांनी हुकले. त्याने २३४ चेंडूत ९७ धावा केल्या होत्या. त्यानंतर सर्फराझ खानने संघाच्या धावांची जबाबदारी स्वाकारली आणि दुसऱ्याच दिवशी मुंबईला ५०० धावांचा टप्पा गाठण्यात मोठी भूमिका बजावली.सरफराजने २०२४ मध्ये इंग्लंडविरुद्ध भारतीय संघाकडून कसोटी पदार्पण केले. यानंतर, त्याने एकूण ३ कसोटी सामन्यांमध्ये ५०.०० च्या सरासरीने २०० धावा केल्या आहेत, ज्यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे. याशिवाय त्याने ५० प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४१८३ धावा आणि ३७ लिस्ट-ए सामन्यांमध्ये ६२९ धावा केल्या आहेत.अवघ्या २५३ चेंडूत २०० धावा पूर्ण केल्या आणि यादरम्यान त्याने २३ चौकार आणि तीन षटकार लगावले. त्याच्यामुळेच मुंबईचा संघ मोठी धावसंख्या गाठण्यात यशस्वी ठरला आहे.१ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या इराणी चषकाच्या सामन्यात मुंबई आणि रेस्ट ऑफ इंडिया संघ आमनेसामने आहेत. या सामन्यात मुंबईने झटपट ४ विकेट लवकर गमावल्या. या सामन्यात मुंबईची सुरुवात खूपच खराब झाली. सलामीवीर पृथ्वी शॉ ७ चेंडूत ४ धावा करून बाद झाला. यानंतर संघाने ३७ धावांत ३ विकेट गमावल्या. मात्र, त्यानंतर रहाणे आणि सर्फराझने जबाबदारी स्वीकारली आणि मुंबईसाठी मोठी भागीदारी केली. रहाणेचे शतक ३ धावांनी हुकले. त्याने २३४ चेंडूत ९७ धावा केल्या होत्या. त्यानंतर सर्फराझ खानने संघांच्या धावांची जबाबदारी स्वाकारली आणि दुसऱ्याच दिवशी मुंबईला ५०० धावांचा टप्पा गाठण्यात मोठी भूमिका बजावली.सरफराजने २०२४ मध्ये इंग्लंडविरुद्ध भारतीय संघाकडून कसोटी पदार्पण केले. यानंतर, त्याने एकूण ३ कसोटी सामन्यांमध्ये ५०.०० च्या सरासरीने २०० धावा केल्या आहेत, ज्यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे.मुंबई क्रिकेट संघाचा विस्फोटक फलंदाज सर्फराझ खानने द्विशतक झळकावले आहे. सध्या सुरू असलेल्या इराणी कप २०२४ मध्ये मुंबई क्रिकेट संघाकडून खेळताना सर्फराझ खानने द्विशतक केले. मुंबई वि रेस्ट ऑफ इंडिया सामन्यात सर्फराझने २५५ चेंडूत २३ चौकार आणि ३ षटकारांसह २०० धावा केल्या. बांगलादेशविरुद्ध नुकत्याच झालेल्या कसोटी मालिकेत सर्फराझ खानला भारतीय संघात संधी मिळाली होती. मात्र त्याला प्लेईंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले नाही. मात्र, आता त्याने इराणी चषकात आपल्या कामगिरीने खळबळ उडवून दिली.सर्फराझ खान डावाच्या सुरुवातीपासूनच चांगल्या लयीत होता आणि कोणतीही जोखीम न घेता त्याने अवघ्या १५० चेंडूत आपले शतक पूर्ण केले. त्याने कर्णधार अजिंक्य रहाणेबरोबर उत्कृष्ट भागीदारी रचली.

### 23 चौकार आणि तीन षटकार

मुंबई संघाला कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्यात तो यशस्वी ठरला. सरफराजने २०२४ मध्ये इंग्लंडविरुद्ध भारतीय संघाकडून कसोटी पदार्पण केले. यानंतर, त्याने एकूण ३ कसोटी सामन्यांमध्ये ५०.०० च्या सरासरीने २०० धावा केल्या आहेत, ज्यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे. याशिवाय त्याने ५० प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४१८३ धावा आणि ३७ लिस्ट-ए सामन्यांमध्ये ६२९ धावा केल्या आहेत. अवघ्या २५३ चेंडूत २०० धावा पूर्ण केल्या आणि यादरम्यान त्याने २३ चौकार आणि तीन षटकार लगावले. त्याच्यामुळेच मुंबईचा संघ मोठी धावसंख्या गाठण्यात यशस्वी ठरला आहे.

# बाबर आझमने कर्णधारपदाचा दिला राजीनामा?

## पाकिस्तानी पत्रकाराच्या पोस्टने चाहते आश्चर्यचकित

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमने पुन्हा एकदा कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. बाबरने सोशल मीडियावर पोस्ट करून चाहत्यांना याची माहिती दिली. बाबरने टी-२० विश्वचषकापूर्वीच पुन्हा कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारली होती, पण आता पुन्हा एकदा माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्सनुसार, बाबर आझमने विराट कोहलीमुळे कर्णधारपदाचा राजीनामा दिला असल्याचे म्हटले जात आहे.**




पाकिस्तानी न्यूज चॅनेल जियो न्यूजचा पत्रकार आरफा फिरोज जेक एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्याने लिहिले, 'इनसाईड स्टोरी- बाबर आझमच्या जवळच्या काही जणांनी बाबरला विराट कोहलीचे उदाहरण दिले आणि असही म्हणू शकतो की बाबरने कर्णधारपदाचा राजीनामा देत विराटच्या पावलावर पाऊल ठेवत पुढे जात आहे. बाबरला विराट कोहलीप्रमाणे वैयक्तिक कामगिरीवर लक्ष केंद्रित करायचे आहे.कोहलीप्रमाणेच बाबर आझमलाही वैयक्तिक कामगिरीवर लक्ष केंद्रित करायचे आहे, असे या पोस्टमध्ये पाकिस्तानी पत्रकाराने म्हटले आहे. विराट कोहलीने २०२१ मध्ये टीम इंडियाचे कर्णधारपद सोडले होते. बाबर आझमने कर्णधारपदाचा राजीनामा दिल्यानंतर चाहत्यांनी बाबरची खिल्ली उडवायला सुरुवात केली. अनेक मीम्सही व्हायरल झाले आहेत.बाबर आझम सध्या त्याच्या क्रिकेट कारकिर्दीतील वाईट टप्प्यातून जात आहे. टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेत त्याने संघाला खूप निराश केले.

### कसोटीतही बाबरची खराब कामगिरी

या स्पर्धेत बाबर आझमच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान संघाला अमेरिकेसारख्या कमकुवत संघाकडून पराभव स्वीकारावा लागला होता. संपूर्ण टी-२० विश्वचषकात बाबरची बॅट शांत होती. टी-२० विश्वचषकातील संघाती कामगिरी पाहता बाबर आझमच्या नेतृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. यानंतर बांगलादेशबरोबर नुकत्याच झालेल्या मायदेशातील कसोटी मालिकेतही बाबरची खराब कामगिरी पाहायला मिळाली.